# संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात

महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९

पोलीस अधिक्षक, पालघर

जाहीरात क्रमांक ०१/२०१९ ठिकाण – पालघर दि. /०८/२०१९

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दि. १८.१.२०१९ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस अधिक्षक, पालघर यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त, आंतरजिल्हा बदली जाणारे व पदोन्नतीने रिक्त होणारी ६१ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यांत येत आहे.

१) पोलीस शिपाई : ,

| | अजा | अज | विज - अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इडब्लुएस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ८ | ४ | ४ | ० | ११ | ५ | २ | २ | ८ | ६ | ११ | ६१ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | २ | २ | ० | २ | २ | १ | १ | ५ | ३ | ६ | २९ |
| महिला | २ | १ | १ | ० | ३ | २ | १ | १ | २ | २ | ३ | १८ |
| खेळाडु | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| प्रकल्पग्रस्त | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | १ | १ | १ | ० | २ | १ | ० | ० | १ | १ | २ | १० |
| अंशकालीन पदवीधर | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | | ० | १ |
| पोलीस पाल्य | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| गृहरक्षक दल | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| एकुण | ८ | ४ | ४ | ० | ११ | ५ | २ | २ | ८ | ६ | ११ | ६१ |

Scanned by CamScanner

अ) उपरोक्त पदे ही दि. ३१.१२.२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदाची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (**Provisional selection**) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणुन नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवु नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे दर्शविलेली पदे व आरक्षण यात बदल होण्याची शक्यता आहे. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे नियुक्ती प्राधिकाऱ्यास राहतील. त्याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही. या कार्यालयाच्या

ड) या कर्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील रिक्त पदे उपलब्ध नाहीत.

२) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह पोलीस पदासाठी पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम – २०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह (शासन निर्णय क्र. जेएलई – १०१५/१६६६/ प्र.क्र. ३०२/ तुरुंग - १, दि. १५.१.२०१६ अन्वये ) लागु आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणांसह **www.mahapolice.gov.in** या संकेत स्थळावर (**Home page**) वर व (**www.palgharpolice.gov.in)** वर उपल्बध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागु राहतील.

महत्वाची टिप : -

पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो पालघर यांना दुरध्वनी क्रमांक ०२५२५२९७२९७ वर त्वरीत संपर्क साधुन तक्रार करावी. तसेच १स संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त /अधीक्षक, या कार्यालयातील वरीष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती - २०१८ तथ अपर पोलीस आयुक्त / अपर पोलीस अधिक्षक /पोलीस उपअधीक्षक, पालघर यांच्याशी संपर्क साधुन तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दुरध्वनी क्रमांकावर तक्रार करता येईल.

www.nmk.co.in

Scanned by CamScanner

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र | संस्था/कार्यालयाचे नाव | दुरध्वनी/मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक, पालघर कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | दुरध्वनी – ०२५२५,२५२१०० मोबाईल क्रमांक - ८६६९६०४१०० |

(गौरव सिंग)
पोलीस अधीक्षक, पालघर

www.nmk.co.in

Scanned by CamScanner